# बेरीज – पुढे मोजून

**शिक्षक** : सलमा, ही दोन रोपं घे, तुझ्या अंगणात लाव.
**सलमा** : नक्की, माझ्या घरी आधीच ५ रोपं लावली आहेत.
**शिक्षक** : व्वा छान! मुलांनो सलमाच्या अंगणात आता किती रोपे होतील?





(रमाने १, २, ३... अशी ७ पर्यंत बोटे मोजली, तर यशने ५ च्या पुढे ६, ७ अशी दोनच बोटे मोजली)

**शिक्षक** : बेरीज दोघांचीही सारखी आणि बरोबरच आहे, परंतु चटकन बेरीज कुणाची झाली?

**यश** : माझी झाली.

**शिक्षक** : समजा ९ काड्या आणि ३ काड्या यांची बेरीज करण्यासाठी त्या एकत्र केल्या आणि मोजल्या, तर उत्तर किती येईल?

**रमा** : ते उत्तर आहे १२ काड्या ! मी १ पासून १२ पर्यंत मोजल्या.



**शिक्षक** : पण ९ च्या पुढे १०, ११, १२ अशा मोजल्या तरी उत्तर १२ येते. इथे ९ काड्या आपल्याजवळ आहेत असे मानून फक्त आणखी मिळालेल्या काड्या ओळीने पुढे मोजल्या.

**यश** : आपल्या जवळ ३ काड्या आहेत, ९ काड्या नव्या मिळाल्या तर ३ च्या पुढे ९ मोजूनही उत्तर १२ येते, पण ३ च्या पुढे ९ मोजण्याऐवजी ९ च्या पुढे ३ मोजणे सोपे !

**पुढे मोजून बेरीज कर.**

२५ + ३, ५ + ३८, ५ + १९, ४ + २३.

सोबत दिलेल्या चौकटींत १ पासून ५० पर्यंत संख्या क्रमाने लिही.

आता तुझी स्वत:ची मोजायची टेप तयार झाली. तिचा उपयोग बेरीज करण्यासाठी कर. ८ व ९ यांची बेरीज करण्यासाठी ८ या अंकावर बोट ठेव. त्याच्यापुढे ९ घरे मोज. १७ ही संख्या आली का ? म्हणजे ८ व ९ यांची बेरीज १७ आली.

- पुढे मोजून बेरीज करा.
- रमाजवळ १८ चिंचोके आणि यशजवळ ७ चिंचोके तर दोघांजवळ मिळून किती चिंचोके?

काय दिले आहे ? रमाचे व यशचे चिंचोके

काय विचारले आहे ? एकूण चिंचोके

काय करूया ? बेरीज

| | | |
|---|---|---|
| | | रमाचे चिंचोके |
| + | | यशचे चिंचोके |
| | | एकूण चिंचोके |

- आनंदजवळ २७ स्टिकर्स आहेत, त्याने आणखी ५ स्टिकर्स विकत घेतले. आता त्याच्या जवळ किती स्टिकर्स झाले?

काय दिले आहे ? ____________

काय विचारले आहे ? ____________

काय करूया ? ____________

| | | |
|---|---|---|
| | | ____________ |
| + | | ____________ |
| | | ____________ |

- पुढे मोजून बेरीज कर.

| | | |
|---|---|---|
| | १ | २ |
| + | | ५ |
| | | |

| | | |
|---|---|---|
| | १ | ५ |
| + | | ४ |
| | | |

| | | |
|---|---|---|
| | ६ | २ |
| + | | ३ |
| | | |

| | | |
|---|---|---|
| | ५ | ४ |
| + | | ८ |
| | | |

| | | |
|---|---|---|
| | ४ | १ |
| + | | ९ |
| | | |

२७ + ८ = ☐ ८ + ☐ = १४ ६७ + ३ = ☐

☐ + ९ = १६ ५४ + ९ = ☐ ४९ + २ = ☐

MN8YVU